**प्रकल्प प्रवर्तक मे. रिजेन्सी टी.एम.टी. प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. १३/२, १३/४, १५/३, १५/२, गाव - खुपरी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या ३,००,००० टीपीए एम.एस. बिलेटस तसेच २,००,००० टीपीए टीएमटी बार्स/एम.एस. चॅनल्स / एगंल्स/बीम/संरचना/रॉड/वायर रॉडच्या उत्पादनाकरिता प्रस्तावित प्रवर्तन भट्टी व रोलिंग मिलच्या उभारणी प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. रिजेन्सी टी.एम.टी. प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. १३/२, १३/४, १५/३, १५/२, गाव - खुपरी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या ३,००,००० टीपीए एम.एस. बिलेटस तसेच २,००,००० टीपीए टीएमटी बार्स / एम.एस.चॅनल्स / एगंल्स / बीम / संरचना / रॉड / वायर रॉडच्या उत्पादनाकरिता प्रस्तावित प्रवर्तन भट्टी व रोलिंग मिलच्या उभारणी प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थान गट नं. १३/२, १३/४, १५/३, १५/२, गाव - खुपरी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री किशोर केर्लीकर, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री गोविंद बोडके, जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री बाबासाहेब कुकडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी

समिती, डॉ. भवानजी आगे पाटील, उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत), वाडा, जिल्हा-पालघर, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. रिजेन्सी टी.एम.टी. प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. १३/२, १३/४, १५/३, १५/२, गाव - खुपरी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांचा गट नं. १३/२, १३/४, १५/३, १५/२, गाव - खुपरी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे प्रस्तावित प्रकल्पाच्या ३,००,००० टीपीए एम.एस. बिलेटस तसेच २,००,००० टीपीए टीएमटी बार्स/एम.एस. चॅनल्स / एगंल्स / बीम / संरचना / रॉड / वायर रॉडच्या उत्पादनाकरिता प्रस्तावित प्रवर्तन भट्टी व रोलिंग मिलच्या उभारणी प्रकल्पासाठी

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब-१ शेड्युल ३ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला होता व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०७ जून, २०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मंगळवार , दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यता

दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६८/२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०९२०एफटीएस०२२९ दिनांक २०/०९/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पालघर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,कल्याण-३<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कल्याण | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक सकाळ (मराठी) व फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत दिनांक ०९-०९-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू

प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर,

५) उप विभागीय अधिकारी-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय,वाडा,, जिल्हा- पालघर,

८) सरपंच, ग्रुप-ग्रामपंचायत,खुपरी,तालका-वाडा, जिल्हा- पालघर

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,

१०) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे,

१२) उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई,

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे एकही आक्षेप प्राप्त झाला नसल्याचे आयोजकाने सांगितले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात सुनावणी दरम्यान देण्यात याव्या असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व

वातावरणीय विभाग, मंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाची गुंतवणूक ही रूपये ९५ कोटी असून सुमारे ३०० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळू शकतो. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसाय व रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासनेः -**

१) **श्री किशोर केर्लीकर, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सादरीकरणात दर्शविण्यात आले आहे की घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी एसटीपी बांधण्यात येणार आहे. तर उत्पादन प्रक्रियेत ३०.० घनमीटर प्रतीदिन औद्योगिक सांडपाणी उत्पन्न होणार आहे. त्या औद्योगिक सांडपाण्याचा प्रकल्पात पुनर्वापर (Recycle) करणार असल्याचे सादरीकरणात दर्शविले. तर प्रकल्पात प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी पुनर्वापर (Recycle) करण्यासाठी कुठली प्रक्रिया करणार/संयत्रणा (Facility) कार्यान्वित करणार याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी सेटलींग टँकमध्ये साठविण्यात येईल. नंतर ब्लोअर केल्यानंतर त्या प्रक्रिया केलेल्या औद्योगिक सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २) | प्रकल्पात इंधन (fuel) कुठले वापरणार याचा उल्लेख नाही. | या प्रकल्पात दुसरे कुठेलेही इंधन वापरण्यात येणार नाही. फक्त वीज (Electricity) वापरण्यात येईल. रोलींग मिलसाठी कुठलेही वेगळे इंधन वापरण्यात येणार नाही. प्रवर्तत भट्टीत वितळलेल्या बिलेटस् ह्या रोलिंग मिलमध्ये प्रत्यक्ष टाकण्यात येतील. |
| ३) | एवढा मोठा प्रकल्प उभारण्यासाठी वीज घेण्यात येणार आहे. तर बॅकअपसाठी डी.जी. सेटचा गरज नाही असे वाटते. याबाबत खुलासा करण्यात यावा. | भविष्यात गरज पडल्यास डी.जी.सेट्सच कार्यान्वित करण्याचा विचार करण्यात आलेला आहे. तो बॅकअपसाठीच वापरण्यात येणार आहे. त्यापासून कोणाला त्रास होऊ नये, म्हणून सर्व काळजी घेण्यात येईल. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक काही विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**२) श्री गोविंद बोडके, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | चर्चेत प्रकल्पासाठी उर्जेचा विषय उपस्थित करण्यात आला. आपण आपल्या प्रकल्पात इंधन म्हणून वीजेचा वापर करणार आहात. तर | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेसाठी सोलर ऊर्जा वापरू शकत नाही. मात्र प्रकल्पातील प्रशासकीय इमारत, अंतर्गत |

| | | |
|---|---|---|
| | भविष्यात प्रकल्पात सोलर उर्जेचा वापर करण्याचे काही नियोजन आहे काय? त्याचप्रमाणे प्रकल्पात सौरउर्जा वापरणे हे व्यवहार्य (feasible) होईल काय? | रस्त्यांवर दिवे, प्रकल्पातील हरित पट्ट्यात दिवे ह्यासाठी सोलर उर्जेचा वापर करण्यात येईल. त्याचप्रमाणे जेथे जेथे शक्य आहे, त्याठिकाणी सोलर उर्जेचा वापर करण्यात येईल. |
| २) | प्रकल्प सुरु झाल्यानंतर परिसरातील रस्त्यांवर वाहतुकीची वर्दळ वाढते व सर्वात जास्त परिणाम होतो, तो परिसरातील रस्त्यांवर. तर रस्ते दुरुस्ती व वाहतुकीसाठी सक्षम ठेवण्यासाठी काही प्रयोजन आहे काय? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पाचा सीईआर निधीतील काही भाग गावातील रस्ते दुरुस्तीसाठी वापरण्यासाठी कंपनी निश्चितच विचार करेल. याबाबत ग्रामस्थांनी केलेल्या सूचनांचा विचार करुनच कंपनी रस्ते विकसित करण्याचे धोरण ठरवेल. |

**<u>३)श्री सदाशिव बागूल, खरीवली, तालुका- वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सीएसआर निधीतून गावासाठी किती खर्च करण्यात येणार आहे? काय करणार आहेत?वर्षाला आपल्या कंपनीकडून किती टक्के खर्च करण्यात येईल.<br>यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की निश्चितच सीएसआर निधी व सीईआर निधी यात फर क आहे. जेव्हा कंपनी प्रथम स्थापन होते, त्यावेळी पहिल्या तीन वर्षी फक्त सीईआर निधी खर्च करावा लागतो. मात्र कंपनी स्थापित झाल्यानंतर तीन वर्षांनी कंपनीस नफा मिळू लागल्यानंतरच सीएसआर निधी खर्च |

| | | |
|---|---|---|
| | सांगितले की सीएसआर व सीईआर यात फरक आहे. | करावा लागतो. जनसुनावणीत व इतर वेळी स्थानिकांच्या मागण्या व गरजा लक्षात घेऊन सीएसआर निधीतील रक्कम खर्च केली जाईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे खुलासा केला की सीएसआर (Corporate Social Responsibility Fund) निधीतील रक्कम काही भाग हा कंपनी नफ्यात असताना करावा लागते. मात्र सीईआर (Corporate Environment Responsibility Fund) निधीतून काही रक्कम ही परिसरात पर्यावरण योजनांसाठी खर्च करावीच लागते, मग ती कंपनी नफ्यात असो वा नसो. |

४)**<u>श्री गोविंद विष्णु पाटील, राहणार-खरीवली, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | रुपये ९५ कोटी प्रकल्पाचे आम्ही स्वागत करतो. पण सदरहू प्रकल्पामुळे भविष्यात परिसरात जे संभाव्य प्रदूषण होणार आहे, ते होऊ | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नये म्हणून कंपनीने जबाबदारी घेऊन कार्यक्षमतेने प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित ठेवावी. स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी. ज्यावेळी कंपनी नफ्यात येईल, त्यावेळी आमच्या ग्रामपंचायत क्षेत्रात सीएसआर निधीतून सामाजीक कार्यांसाठी खर्च करण्यात यावा. या रिजेन्सी ग्रुपचे प्रकल्पासाठी अभिनंदन व पाठिंबा. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती केली की असे चांगले प्रकल्प हे आमच्या तालुक्यात आणावेत. | |

प्रतिनिधी, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**५) श्री दीपक अंकुश वड, राहणार- मौजे खुपरी,**

**तालुका-वाडा,जिल्हा-पालघर:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्प उभारणीमुळे स्थानिकांना कोणते फायदे होतील? | स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. विविध सामाजीक उपक्रम |

| | | |
|---|---|---|
| | | राबविण्यात येतील. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होईल. |
| २) | जल, वायू प्रदूषण होणार नसल्यास हा प्रकल्प उभारण्यास हरकत नाही. पण जर प्रदूषण होणार असेल, तर कंपनीकडून प्रदूषण नियंत्रणासाठी कोणती उपाय योजना करण्यात येईल? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रदूषण न होण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येतील. याबाबत माहिती चर्चेत सांगितलेली आहे. |
| ३) | गावातील नागरिकांना शैक्षणिक, सामाजीक व वैदकीय कोणत्या सुविधा प्राप्त करुन देऊ शकतात? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावातील नागरिकांसाठी शैक्षणिक, वैदकीय सुविधा पुरविण्यासाठी गावकयांशी चर्चा करुन योजना राबविण्यात येतील. |
| ४) | आमच्या खुपरी गावात आदिवासी विकास सेवाभावी संस्था या संस्थेची नोंदणी झालेली असून आमच्या स्थानिकांची अपेक्षा होती की या संस्थेसाठी कंपनी एखादी ॲम्बुलन्सची व्यवस्था करु शकते काय? | येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जो ॲम्बुलन्स उपलब्ध करण्याचा जो प्रस्ताव बैठकीत करण्यात आला, त्यानुसार कंपनीकडून ग्रामपंचायतीस एक ॲम्बुलन्स देण्यात येईल. त्याचप्रमाणे पुर्वीप्रमाणेच गावातील मुलांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येईल. |

**६) श्री संजय गणपत जाधव, सदस्य,खुपरी ग्रामपंचायत, माजी सरपंच:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम कंपनीचे स्वागत. प्रकल्प आलेच पाहिजेत. पण पर्यावरणाबाबत येथे प्रकल्पाच्या १० कि.मी.परिघ पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone – ESZ) घोषित करण्यात आलेले होते, त्याची सद्यस्थिती याबाबत शासनाने काही सुधारित शासन निर्णय किंवा मार्गदर्शक सूचना याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. पर्यावरण संदर्भात ग्रामपंचायतीस मार्गदर्शन करण्यास सांगितले होते. मार्गदर्शन मिळाले नाही. जर अंतर कमी करण्याचा जी.आर असेल, तो उपलब्ध करण्यात यावा. याबाबत ज्या लेखी स्वरुपात ज्या सूचना करायच्या आहेत, त्या सादर करण्यात येतील. | पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone – ESZ यासाठी रेंज वन अधिकारी (Range Forest Officer) वाडा यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम विभाग कार्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार तानास अभायरण्य हे प्रकल्पस्थानापासून जीपीएस प्रणालीनुसार १२ कि.मी. असून ते प्रकल्प परिघाच्या १० कि.मी. परिघात येत नाही. |

प्रतिनिधी, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

७) <u>श्री शाम गणपत जाधव, राहणार- खुपरी,</u>

<u>तालुका-वाडा,जिल्हा-पालघर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी चालू आहे. मात्र प्रकल्पाविषयी व जनसुनावणीबाबत सर्व माहिती ही सामान्य लोकांपर्यत पोचलीच नाही. जर लोकांना आगाऊ सूचना मिळाली असती तर लोकांनी प्रकल्पाविषयी आक्षेप नोंदविले असते. याबाबत मी माझी तक्रार लेखी स्वरुपात नोंदवित आहेत. | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर जनसुनावणीबाबत जाहिर सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत- येथे सकाळ पेपर मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्र – येथे इंग्रजी पेपर फ्री प्रेस जर्नल मध्ये दिनांक ९ सप्टेबर, २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे संपूर्ण दस्तावेज पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सांराश अहवाल इंग्रजी व मराठी प्रत स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद, उप विभागीय अधिकारी-वाडा, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय-पालघर येथे जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेला |

| | | |
|---|---|---|
| | | होता. संबंधित कार्यालयास दस्तावेज सुपुर्द केल्याचा पुरावा म.प्र.नि.मंडळाकडे आहे. त्यात जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप हे लेखी-पोस्टाने, ईमेलव्दारे आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. |

८) **सौ. प्रारब्ध्या प्रकाश तांडेल, सरपंच, खुपरी ग्रामपंचायत, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्पाचे खुपरी गावात स्वागत. प्रकल्पांमुळे स्थानीकांना रोजगार मिळेल, त्याचप्रमाणे विविध प्रकल्पांमुळे ग्रामपंचायतीस कररुपाने उत्पन्न मिळते. विकासासाठी बरेच प्रकल्प हातभार लावतात. तर कंपनीस विनंती की येथील स्थानिक, आदीवासी यांना रोजगाराची संधी प्रकल्पात देण्यात यावी. कंपनी व्यवस्थापनाने प्रदूषण न होण्याची खबरदारी घ्यावी. प्रकल्पास पूर्णपणे पाठिंबा. | सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांना प्रकल्प प्रवर्तकांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. जरी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असली, तरीही स्थानिकांनी मागणी केल्यानुसार कंपनीने ॲम्बुलन्स देण्याचे मान्य केलेले आहे. यावरुन त्यांची सहकार्याची भावना दिसते.

**अध्यक्ष,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प अधिका-यांनी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याचे मान्य केलेले आहे. येथे स्थानिक युवकांना सूचना करण्यात येते की या प्रकल्पात व इतरही प्रकल्पात ज्या कौशल्याची गरज आहे, ते शिक्षण आत्मसात करण्यात यावे. त्याचे प्रशिक्षण घेण्यात यावे. स्वःताला रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न करावा. कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेतल्यास शासन नेहमीच सहकार्य करत असते.

बैठकीचा समारोप करताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले.

**आयोजक,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मा. अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत शासनास सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते. सदस्य यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्षांच्या संमतीने जनसुनावणी संपन्न झाली असे जाहिर केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून ही जनसुनावणी संपल्याचे जाहिर करण्यात आले.

सोबत प्राप्त झालेले लेखी सूचना/आक्षेप : ०२ जोडण्यात आलेले आहेत.

**(किशोर केर्लीकर)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(गोविंद बोडके, भाप्रसे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, पालघर,
जिल्हा-पालघर